**जादा विषयांची विषय पत्रिका**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २६/०८/२०२२

प्रति,
मा. --------------------------------------
स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०८ गुरूवार दि.०१/०९/२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** पुर्वीचे अ.नं.८५ ते ९० व खालील अ.नं.९१ व ९२ या जादा विषयांवर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण प्रत्यक्ष उपस्थीतीने सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**गुरूवार दिनांक -०१/ ०९ /२०२२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ९१ | "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास व संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकनार्थ सादर. |
| ९२ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता सण उत्सवा करीता मंडप, स्टेज,बॅरेकेटिंग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |

**विषय क्रमांक : ८५** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.गणेश पांडुरंग घोरपडे २)श्री.मयुर सुरेश आल्हाट यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विषयः- श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, स्वे.से.नि.सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने त्यांचा मुलगा श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांना " सफ़ाई कामगार " या पदावर नियुक्ती देणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. पांडुरंग अशोक घोरपडे हे अहमदनगर महानगरपालिकेत दि. ०३/११/२००१ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होते, ते दि. ०३/०५/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा मुलगा श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांनी दिनांक ३०/०६/२०२२ रोजी अर्ज देऊन " वडील श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी" अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत

१.सेवानिवृत्त कर्मचा-याचे मुलास नोकरी देण्याचे समतीअर्ज.२.सेवानिवृत्त कर्मचा-याचे मुलास नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.३. कुटुंबातील इतर व्यक्तींचे नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.४.एकत्रित कुटुंबात रहात असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र.५.कुटुंबाचे पालन पोषन करणेचे स्वयंघोषणापत्र.६.लहान कुटुंबाचे स्वयंघोषणापत्र ७.कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे स्वयंघोषणापत्र ८.आधारकार्ड ९.शिधापत्रिक.१०जातीचा दाखला.११.शाळा सोडल्याचा दाखला.१२.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.१३.ई. १० वी पासचे गुणपत्रक.१४.एज ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट.१५.जन्म दाखला.१६.श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, स्वे.से.नि.सफ़ाई कामगार यांचा नेमणुक आदेश, सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत, जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, सेवानिवृत्ती आदेश, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसाक्षाकींत प्रती.

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा. शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. गणेश पांडुरंग घोरपडे हे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** ह्या वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |



| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झेड. एल. ५०३३२२ दि.०७/०६/२०२२ रोजीचे स्वयंघोषणा प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, सफ़ाई कामगार हे दि.०३/०५/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दिनांक ३०/०६/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीअर्ज व स्वयंघोषणापत्र. क्र. झेड.एल. ५०३३२७ दि.०७/०६/२०२२ अन्वये मुलगा श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र क्र. झेड.एल.५०३३२३ दि.७/६/२०२२ अन्वये व शिधा पत्रिका क्र. एस. जी.३७२७३२ ची स्वसाक्षाकींत प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, सफ़ाई कामगार हे दि. ०३/०५/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांनी दि. ३०/०६/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला पाहता ते हिंदु-मांग या जातीचे आहेत. व त्यांचा मुलगा श्री.गणेश पांडुरंग घोरपडे यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्री. पांडुरंग अशोक घोरपडे हे अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे. " तथापी श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र. झेड. एल. ५०३३२४ दिनांक ०७/०६/२०२२ रोजीचे स्वयंघोषणापत्र सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि. ३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल."

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फत पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील. याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.२५६५ दि.०४/०७/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/९२/२०२२ दि.०८/०७/२०२२ अन्वये "श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झ ाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा | जन्म दिनांक | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा | जात प्र-वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| श्री. पांडुरंग अशोक घोरपडे, सफ़ाई कामगार | २४/१२/१९७५ | ई. ९ वी पास | ०३/११/२००१ | ०३/०५/२०२२ स्वेच्छा से. नि. २० वर्ष ४ महिने | हिंदु-मांग (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अर्जदाराचे नांव व नाते | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | जात प्र-वर्ग | द्यावयाचे पदाचे नांव | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड |
|---|---|---|---|---|---|
| श्री. गणेश पांडुरंग घोरपडे, मुलगा | ई. १० वी पास | २१/१२/१९९९ वय- २२ वर्षे ( जन्म प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३०० |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. मनपा ठरावानुसार मनपातील श्री. पांडुरंग अशोक घोरपडे,स्वे.से. नि.सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. गणेश पांडुरंग घोरपडे यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळ वेतन र ४४४० अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य लिपीक ,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

विषयः- श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, स्वे.से.नि.सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने त्यांचा मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांना " सफ़ाई कामगार " या पदावर नियुक्ती देणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती. मैना सुरेश आल्हाट ह्या अहमदनगर महानगरपालिकेत दि. १८/११/२००० पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होत्या, त्या दि. २८/०६/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांनी दिनांक ३०/०६/२०२२ रोजी अर्ज देऊन " आई श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी" अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.१.सेवानिवृत्त कर्मचा-याचे मुलास नोकरी देण्याचे समतीअर्ज.२.सेवानिवृत्त कर्मचा-याचे मुलास नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.३. कुटुंबातील इतर व्यक्तींचे नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.४.एकत्रित कुटुंबात रहात असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र.५.कुटुंबाचे पालन पोषन करणेचे स्वयंघोषणापत्र. ६.लहान कुटुंबाचे स्वयंघोषणापत्र ७.कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे स्वयंघोषणापत्र ८.आधारकार्ड ९.मतदान कार्ड.१०.पॅनकार्ड.११.शिधापत्रिका.१२.जातीचा दाखला.१३.शाळा सोडल्याचा दाखला.१४.सेवा योजन कार्यालयाकडे

नोंद केलेची स्लीप.१५.ई. १० वी नापासचे गुणपत्रक.१६. जन्म दाखला.१७.श्रीमती. मैना सुरेश अल्हाट, स्वे.से.नि.सफ़ाई कामगार यांचा नेमणुक आदेश, सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत, जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, सेवानिवृत्ती आदेश, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसाक्षाकींत प्रत.१८.एज ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट.

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा. शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दि.२१ ऑक्टों२०११, दिनांक २६/२/२०१४ व शा.नि. दि. ११/३/२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. मयुर सुरेश आल्हाट हे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** हा वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झेड. एच. ४७३२७५ दि.२९/०६/२०२२ रोजीचे स्वयंघोषणा प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, सफ़ाई कामगार ह्या दि.०३/०५/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दिनांक २९/०६/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीअर्ज व स्वयंघोषणापत्र.क्र.झेड.एच. ४७३२७७ दि.२९/०६/२०२२ अन्वये मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र क्र. झेड.एच.४७३२७४ दि.२९/६/२०२२ अन्वये व शिधा पत्रिका क्र. डब्ल्यु. जी.०३३२२३१ ची स्वसाक्षाकींत प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, सफ़ाई कामगार ह्या दि. २८/०६/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांनी दि. ३०/०६/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला पाहता त्या हिंदु-मांग या जातीचे आहेत. व त्यांचा मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्रीमती. मैना सुरेश आल्हाट ह्या अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे. " तथापी श्री. मयुर सुरेश आल्हाट यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र. झेड. एच. ४७३२७६ दिनांक २९/०६/२०२२ रोजीचे स्वयंघोषणापत्र सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि. ३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेबंर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दि. २३ /०९/२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील. याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था. २५६४ दि.०४/०७/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक,

अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/९१/२०२२ दि.०८/०७/२०२२ अन्वये "श्री. मयुर सुरेश आल्हाट यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १०/१२/२०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.
"सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी/आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ,याबाबतचा अर्ज प्राप्त झ ाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात व प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, सफ़ाई कामगार | ०१/०१/१९६७ | ई.२ री | १८/११/२००० | २८/०६/२०२२ स्वेच्छा से. नि. २१ वर्ष ६ महिने | हिंदु-मांग (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात व प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. मयुर सुरेश आल्हाट, मुलगा | ई. १० वी नापास | ३१/०७/१९९० वय- ३२ वर्षे ( जन्म प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३०० |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील श्रीमती. मैना सुरेश आल्हाट, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. मयुर सुरेश आल्हाट यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळ वेतन र ४४४० अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.
येणे प्रमाणे मुख्य लिपीक ,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
यावर मा.सहाय्यक आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.
यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.
यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित "अ"

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.गणेश पांडुरंग घोरपडे २)श्री.मयुर सुरेश आल्हाट यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.गणेश पांडुरंग घोरपडे २)श्री.मयुर सुरेश आल्हाट यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.गणेश पांडुरंग घोरपडे २)श्री.मयुर सुरेश आल्हाट यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.श्री.रविंद्र बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

---

**विषय क्रमांक : ८६** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त कर्मचारी श्री.रमेश साहेबराव चौधरी वरिष्ठ लिपीक,यांची मानधनावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ :- १) इकडील जा.क्र.शहर पा.पु.११३१ दि.२८/१२/२०२१ अन्वये आदेश.

२) श्री.रमेश साहेबराब चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक,यांचा दि.०५/०७/२०२२ रोजीचा अर्ज.

विनंती रिपोर्ट सादर की,शहर पाणी पुरवठा मुख्यालयाकडील श्री.रमेश साहेबराव चौधरी,वरिष्ठ लिपीक हे दि.३०/११/२०२१ रोजी महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले आहेत.या निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे संदर्भीय अर्ज इकडेस प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मानधनावर काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की,शहर पाणी पुरवठा विभाग (मुख्यालय) कडील सर्व कामासाठी सद्यस्थितीत ०१ वरिष्ठ लिपीक ,०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कार्यरत होते.परंतु दि.३०/११/२०२१ रोजी या विभागाकडील वरिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत असलेले श्री.रमेश चौधरी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत या विभागाकडे फक्त ०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कार्यरत आहेत.

त्यासाठी एक मुख्य लिपीक/अनुभवी हेडक्लार्क व किमान तीन लिपीक टंकलेखक संवर्गातील कर्मचारी लवकरात लवकर उपलब्ध करून देणे बाबत मंजूर प्रस्तावाअन्वेय आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.

पर्यायाने कर्मचा-यां अभावी आजमितीस विभागाकडील दैनंदिन कामा व्यतिरीक्त वारनिशी आवक/जावक,माहितीचा अधिकार,शहरपाणी योजनेवरील वीज वितरण कंपनीचे दरमहाचे उच्चदाबाचे वीजबिल अदा करणे, मुळा धरणावरील अशुध्द पाणी उचलून मा.कार्यकारी अभियंता यांचे (एरिगेशन विभागाचे ) दरमहाचे मासिक बिल तयार करणे,व लोकल फंड तयार करणे,लोकशाही दिनाची तक्रार निरासन करणे,विधानसभा तारांकित प्रश्न निवारण करणे तसेच मानधनावरील कर्मचारी यांचे प्रस्ताव बाबत कार्यवाही करणे ,वार्षिक अर्थसंकल्प बाबत कार्यवाही करणे,शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तोत्रिक /अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामी नेमणूक केलेल्या ठेकेदाराचे देयक अदा करणे इत्यादी कार्यालयीन कामे कर्मचा-या अभावी पुर्ण: थांबण्याची शक्यता आहे.

व या बाबीकडे वेळीच लक्ष न दिल्यास (कर्मचा-यांच्या नेमणूक न झाल्यास) गंभीर परिस्थिती निर्माण हावून महानगरपालिका प्रशासन त्यास सामोरे जावे लागणार आहे.असे वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

त्यासाठी महानगरपलिकेकडून शहर पाणी पुरवठा विभाग (मुख्यालय) करीता आस्थापना विभगाकडून कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यंत पाणी पुरवठा विभागाकडील हेडक्लार्क पदाचा कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेल श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक कामाचा उत्तम अनुभव आहे.

यास्तव पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री.रमेश साहेबराव चौधरी ,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ०६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी व दर महा मानधनावर मुदतवाढीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे संयुक्तीक राहील.

येणे प्रमाणे लिपीक पाणी पुरवठा यांचा अहवाल असे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यवर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त कर्मचारी श्री.रमेश साहेबराव चौधरी वरिष्ठ लिपीक,यांची मानधनावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात यावे.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त कर्मचारी श्री.रमेश साहेबराव चौधरी वरिष्ठ लिपीक,यांची मानधनावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सेवानिवृत्त कर्मचारी श्री.रमेश साहेबराव चौधरी वरिष्ठ लिपीक,यांची मानधनावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

**विषय क्रमांक : ८७** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६५६७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये डॉन बॉस्को ओपन स्पेसमध्ये सभा मंडप बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे.या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.२८/०३/२०२२

२.ई - निविदा क्रमांक ७९६५६७/सन २०२२ दि.०९/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधी:- दि.०९/०५/२०२२ ते दि.०२/०६/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.०९/०५/२०२२ ते दि.०२/०६/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०६/०६/२०२२

६.कामाची मुदत :- ०६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.३०/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९६५६७ | प्रभाग क्रं.१ मध्ये डॉन बॉस्को ओपन स्पेस मध्ये सभा मंडप बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे | ६२,०३,५५१/- | ओमसाई कंन्स्ट्रक्शन अ.नगर | निविदा दरापेक्षा २०.००%जादा दराने | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर |
| | | | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर | निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अ.नगर,यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने अलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि आलेले दर हे अवाजवी असल्याने त्यांना संदर्भ क्र.१ नुसार वाटाघाटीसाठी पत्र देण्यात आले.त्यानुसार त्यांनी संदर्भ क्र.२ अन्वये सदर काम निविदा दराने करण्यास तयार असलेबाबत कळविले आहे.

तरी मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांनी सदर काम निविदा दराने मंजुर करणेकामी सदरचा अहवाल मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./ अ

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,टि.५ वरील शेंरांकनावरील मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेनुसार विभागाने कार्यवाही करावी./ब

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" "ब" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी सुचविल्यानुसार विभागाने कार्यवाही करणे आवश्यक राहिल व त्यानुसार निविदा दराची निविदा निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर निर्णयासाठी ठेवण्यास.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६५६७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये डॉन बॉस्को ओपन स्पेसमध्ये सभा मंडप बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे.या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६५६७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये डॉन बॉस्को ओपन स्पेसमध्ये सभा मंडप बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६५६७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये डॉन बॉस्को ओपन स्पेसमध्ये सभा मंडप बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

**विषय क्रमांक : ८८** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९५९४९ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील अण्णाभाउ साठे चौक ते सिध्दार्थनगर ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन ते बालीकाश्रमरोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.२८/०३/२०२२

२.ई - निविदा क्रमांक ७९५९४९/सन २०२२-२३ दि.०६/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधीः- दि.०६/०५/२०२२ ते दि.३०/०५/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.०६/०५/२०२२ ते दि.३०/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०१/०६/२०२२

६.कामाची मुदत :- ०६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.३०/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

प्राप्त निविदा दराच्या छाननी :- दि.०२/०८/२०२२ रोजीच्या छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९५९४९ | प्रभाग क्रं.९ मधील अण्णाभाउ साठे चौक ते सिध्दार्थनगर ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन ते बालीकाश्रम रोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ६८,४६,४२१/- | ओमसाई कंन्स्ट्रक्शन अ.नगर | निविदा दरापेक्षा २०.००%जादा दराने | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर |
| | | | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर | निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अ.नगर,यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने अलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि आलेले दर हे अवाजवी आहेत. तथापि सदर निविदाधारकाने इकडेस पत्र देवुन सदर काम निविदा दराने करणेस तयार असल्याबाबत कळविले आहे.

तरी मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांना सदर काम निविदा दराने देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./ अ

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,संबंधीत निविदाधारक काम निविदादराने करणेस तयार असल्याने निविदा मान्यतेस मा.स्थायी समितीसमोर सादर करणे योग्य.आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,कृपया ई - निविदा क्रमांक तपासुन फेर सादर करावे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रशासनाचे ई निविदाबाबतचे सर्व कागदपत्रावरील ई निविदा क्रमांक तपासुन फेरसादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,टि.५ वरील शेरांकनावरील मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेनुसार विभागाने कार्यवाही करावी./ब

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" "ब" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी सुचविल्यानुसार विभागाने कार्यवाही करणे आवश्यक राहिल व त्यानुसार निविदा दराची निविदा निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर निर्णयासाठी ठेवण्यास.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९५९४९ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील अण्णाभाउ साठे चौक ते सिध्दार्थनगर ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन ते बालीकाश्रमरोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९५९४९ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील अण्णाभाउ साठे चौक ते सिध्दार्थनगर ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन ते बालीकाश्रमरोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९५९४९ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील अण्णाभाउ साठे चौक ते सिध्दार्थनगर ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन ते बालीकाश्रमरोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

**विषय क्रमांक : ८९** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६६२७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये मनमाड रोड ते भिंगारदिवे मळयापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे (पोहोच रस्ता) या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.२८/०३/२०२२

२.ई - निविदा क्रमांक ७९६६२७/सन २०२२-२३ दि.०९/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधीः- दि.०९/०५/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.०९/०५/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.२५/०५/२०२२

६.कामाची मुदत :- ०६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.३०/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९६६२७ | प्रभाग क्रमांक १ मध्ये मनमाड रोड ते भिंगारदिवे मळयापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे (पोहोच रस्ता) | ४१,३२,४९४/- | ओमसाई कंन्स्ट्रक्शन अ.नगर | निविदा दरापेक्षा १५.००%जादा दराने | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर |
| | | | मे.एस.एफ.शेख कंस्ट्र. अहमदनगर | निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अ.नगर,यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने अलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि आलेले दर हे अवाजवी आहेत. तथापि सदर निविदाधारकाने इकडेस पत्र देवुन सदर काम निविदा दराने करणेस तयार असल्याबाबत कळविले आहे.

तरी मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांना सदर काम निविदा दराने देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे निविदा दराने निविदा दाराची निविदा "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निविदा दराची निविदा निर्णयासाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६६२७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये मनमाड रोड ते भिंगारदिवे मळयापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे (पोहोच रस्ता) या कामाच्या निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६६२७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये मनमाड रोड ते भिंगारदिवे मळयापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे (पोहोच रस्ता) या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ ई निविदा क्रमांक ७९६६२७ या निविदे अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये मनमाड रोड ते भिंगारदिवे मळयापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करणे (पोहोच रस्ता) या कामाकरीता निविदाधाकर मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८

**विषय क्रमांक : ९०** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हिड १९ संशयित/संपर्कातील व्यक्तींचे आर टी पी सी आर चाचणी खाजगी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करून घेणे बाबतचे देयके अदा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

**प्रस्तावना,**

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की,कोव्हिड १९आजाराचे निदान करण्यासाठी जिल्हा रूग्णालयामध्ये मोफत स्वरूपात चाचण्या केल्या जात होत्या.दिनांक ०८/०५/२०२१ ते दिनांक ०५/०६/२०२१ या कालावधीत मोठया प्रमाणात काव्हिड आजार वाढत होता.जिल्हा रूग्णालय प्रयोगशाळेची क्षमता कमी होती,मा.केंद्र शासन व मा.राज्य शासनाच्या सुचनांनुसार सदरच्या चाचण्या विहित मुदतीत करणे गरजेचे होते.मा.शासनाने ICMR मान्यताप्राप्त प्रयोगशाळांना शासनाने ठरवुन दिलेल्या दराप्रमाणे चाचण्या करून घेण्याचे निर्देश वेळोवेळी दिलेले आहेत.अहमदनगर जिल्हाकरीता जिल्हारूग्णालय एकमेव प्रयोगशाळा उपलब्ध होती.मोठया प्रमाणात नमुन्यांची संख्या असल्याने विहित मुदतीत अहवाल जिल्हा रूग्णालयाने देणे शक्य नव्हते.मा.शासनाच्या ICMR मान्यताप्राप्त प्रयोगशाळेस मा.आयुक्त तथा सक्षम अधिकारी यांनी आरोग्य जा.क्र.२४७ दि.२९/०४/२०२१ च्या आदेशानुसार मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेला सोपविले होते.सदर संस्थेने दि.०८/०५/२०२१ ते ०५/०६/२०२१ कालावधीत २४६८० स्त्रावांचे नमुने तपासुन अहमदनगर महानगरपालिकेकडे सादर केले आहे.दरम्यानच्या काळात अहमदनगर महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नसल्याने देयके अदा करणे शक्य नव्हते.सद्यस्थितीत मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्या जा.क्र.आव्यमपु/कार्या १९ अ /३३५ /२०२२ दि.३१/०३/२०२२ या पत्रान्वये कोव्हिड -१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी निधी वितरीत करणेबाबत या बाबींवर निधी खर्च करणेकरिता निधी प्राप्त झालेअसुन मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे चे एकुण रू.१,३७,०८,०००/- देयक अदा करणेकरिता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) अन्वये सादर करण्यात येत आहे.सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रूग्णांच्या नाक व घश्याच्या स्त्रावाचे नमुने तपासणीसाठी जिल्हा सामान्य रूग्णालय,अहमदनगर येथे पाठविण्यात येत होते.तथापी कोविड आजाराचा वाढता प्रार्दुभाव पाहता जिल्हा सामान्य रूग्णालय येथे १००० पेक्षा जास्त नमुने तपासणीकरीता असल्याने जिल्हा सामान्य रूग्णालयाने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड-१९ संदर्भातील तपासण्याबाबत असमर्थता दर्शविलेली होती.परिणामी अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड -१९ संशयीत/ संपर्कातील व्यक्तींचे नाक,घसा,स्त्राव नमुने यांची आर.टी.पी.सी.आर.चाचण्या करणेबाबत अडचणी निर्माण झालेली असल्याने नागरीकांकडून रोष पत्करावा लागत होता.

त्या अनुषंगाने मा.शासनाने निश्चित केलेल्या दरांनुसार संदर्भ क्र.१ अन्वये मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजुरीने मे.मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.ठाणे या संस्थेस प्रति चाचणी रू.५००/- या प्रमाणे कोव्हीड -१९

संशयीत/संपर्कातील व्यक्तींचे नाक,घसा स्त्राव नमुने संकलीत करून चाचणी करणेबाबत संदर्भ क्र.२अन्वये आदेश देण्यात आलेले होते.तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या कोरोना संदर्भातील मिटींग मध्ये जिल्हा सामान्य रूग्णालय येथील दि.३/०५/२०२१ ते ०५/०५/२०२१ या कालावधीतील महानगरपालिका कार्यक्षेत्राव्यतीरिक्त करण्यात आलेल्या आर.टी.पी.सी.आर.चाचण्या अहमदनगर महानगरपालिकेने नियुक्ती केलेली खाजगी संस्था मे.मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.ठाणे या संस्थे मार्फत करणेबाबत व त्याकालावधीतील देयक अदा करणेबाबत निंदेश दिलेल होते.

त्या अनुषंगाने सदर संस्थेने दि.०१मे २०२१ ते ०७मे २०२१ अखेरचे देयकांचा तक्ता खालील प्रमाणे
मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.
दि.०१/०५/२०२१ ते ०७/०५/२०२१ बील नं.MPLLP/२०२१-२२/१२५

| अ.नं. | दिनांक | मनपा कार्यक्षेत्रातील चाचण्या | मनपा कार्यक्षेत्रा व्यतिरीक्त चाचण्या | एकुण चाचण्या |
|---|---|---|---|---|
| १ | १/५/२०२२ | १९७ | ० | १९७ |
| २ | २/५/२०२२ | १३३ | ० | १३३ |
| ३ | ३/५/२०२२ | ३१२ | ० | ३१२ |
| ४ | ४/५/२०२२ | २३० | १०१ | ३३१ |
| ५ | ५/५/२०२२ | २२३ | ४४ | २६७ |
| ६ | ६/५/२०२२ | ३२३ | ७ | ३३० |
| ७ | ७/५/२०२२ | ३०१ | ० | ३०१ |
| | | | | १८७१ |

| एकुण चाचण्या | प्रति चाचणी दर | एकुण देयक |
|---|---|---|
| १८७१ | ५०० | ९,३५,५०० |

तरी सादर केलेले देयके मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेच्या नावे अदा करणेस प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर लेखा व्यवस्थापक एन.यु.एच.एम.यांचा अहवाल असे.

यावर मा.वैद्यकिय आरोगय अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मंजुरी देणेस हरकत नाही.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,सध्या ७५% देयक अदा करण्यास हरकत नाही.

NUHM CAM यांचा अभिप्राय की,सदरच्या प्रस्तावात ICMR पोर्टलवर सर्व नोंदी तपासलेल्या आहेत.तरी मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" प्रस्तावितनुसार पुढील कार्यवाही होणेस हरकत नाही.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१.कार्यारंभ आदेश जा.२ मा. दि.२९/४/२०२१ च्या आदेशामध्ये मनपा क्षेत्रात RTPCRचाचणी करणे बाबत नमुद केले परंतु देयकाचे प्रस्तावात मनपा कार्यक्षेत्राबाहेर केलेल्या चाचणी संख्या १५२ दिसून येत असल्या मंजुर करता येणार नाही.२. मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेचे RTPCR चाचणी देयक रक्कम रू.१.३७ कोटी इतके दिसन येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील नियम ७३(क) नुसार कार्यवाही केलेली नाही.३.मा.जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन कक्ष यांचे ३१/३/२२ च्या आदेशातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन निधी खर्च करताना अट

क्र.२प्रशासकीय मान्यता तांत्रीक मान्यता निविदा प्रक्रिया केल्याचे दिसून येत नाही.३.मा.जिल्हास्तरीय तांत्रीक समिती मंजूरी आदेश सादर केले नाही.४.उदयोग उर्जा कामगार विभाग शासन निर्णय १/१२/१६ नियम ३.२.८ नुसार EOIभागवताना दरासाठी निविदा प्रक्रिया व मागवताना केवळ तांत्रीक निविदा मागवून प्ररवठा आदेश देता येईल.त्यासाठी तांत्रीक तपासणी करण्याचे १ ते ४ मुद्दे नमुद केले आहेत.तथापी विभागाने ३.२.८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.५.देयकात नमूद रकमेवर मुद्रांक शुल्क घेतले नाही.६. अनामत रकमा मनपा निधीत जमा झालेचे विभगाने खात्री करून उपरोक्त बाबींची खात्रीकरून पुर्ततासह फेरसादर करावे.

यावर शहर लेखा व्यवस्थापक एन.यु.एच.एम.यांचा अभिप्राय की,फेरसादर,मुद्दा क्र.१मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेचे आर टी पी सी आर चाचणी देयक एकुण रक्कम रू.अंदाजे १.३७ कोटी इतकी दिसून येत असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) प्रमाणे कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

खुलासा :-

*कोविड १९ हि जागतीक महामारी असल्याने दि.१४/०३/२०२० च्या नोटीफिकेशव्दारे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून सदरच्या साथरोग कायदा १८९७ ची अंमलबजावणी सक्षम प्राधिकारी म्हणून सदरच्या साथरोग कायदा १८९७ ची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

*महाराष्ट्र शासनाने कोविड १९ चे रूग्ण दाखल केल्यानंतर करण्यात येणा-या उपचारा संदर्भात खाजगी दवाखान्यांचे दर वेळोवेळी निश्चित केलेले आहे.

*मा.शासनाने ॲन्टीजन चाचणी,कोविड १९ चाचणी,आर टी पी सी आर,एच आर सी टी इ.चे दर कर सुध्दा सर्व प्रमाणित केंद्रासाठी संपुर्ण महाराष्ट्र राज्यात एक असावेत या प्रमाणे दर निश्चिती करून त्याचा शासन निर्णय वेळोवेळी निर्गमित केलेलाआहे.

*शासन निर्णय दि.१ डिसेंबर २०१६ चे उदयोग उर्जा व कामगार विभागाचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे मुद्दा क्र.३ .३ विशेष परिस्थितीतील खरेदी व तातडीचा खरेदी आदेश व त्याचप्रमाणे ३.३.२ मधील (अ) चे अवलोकन कोविड नियंत्रणासाठी करणे आवश्यक राहिल.

वरील सर्व बाबींचा विचार करता शासनाने दर निश्चित केल्याप्रमाणे पात्र संस्थेस संपुर्ण जिल्हयामध्ये जिल्हा प्रशासनाने आर टी पी सी आर चाचण्याचे काम दिलेले होते.या संस्थेमार्फत याच दराने जिल्हा रूग्णालय,अहमदनगर येथे सुध्दा काम झालेले आहे.त्यामुळे दर शासनानेच निश्चित केलेले असल्याने मनपा अधिनियम १९४९ मधील नियम ७३ (क) उद्‌भवत नाही.तथापी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ७४ (२) या संविदेला लागू होत असल्याचे मत आहे.

मुद्दा क्र.२ उदयोग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय,शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील नियम ३.२.८ नुसार E.O.I.मागवतांना दरासाठी निविदा न मागवता केवळ तांत्रिक निविदा मागवून पुरवठा आदेश देता येईल.त्यासाठी तांत्रिक पात्रता तपासणी करण्याचे १ ते ४ मुद्दे नमुद केले आहेत.तथापि विभागाने ३.२.८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

खुलासा :- कोविड १९ ही विशेष परिस्थिती (जागतीक महामारी) असल्याने त्याचे नियंत्रण ही तातडीची बाब म्हणून सक्षम प्राधिकरी यांचे मान्यतेने उपरोक्त कार्यवाही करण्यात आली असल्याचे सदर प्रक्रियेला ३.३ उदयोग अर्जा व कामगार विभाग,शसन निर्ण दि.१/१२/२०१६ चा नियम ३.३ (१ व २) लागू होत असल्याचे मत आहे.

मुद्दा क्र.३ जिल्हास्तरीय तांत्रिक समितीचे मंजुरी आदेश सोबत जोडण्यात यावे.

खुलासा :- सक्षम प्राधिकारी मा.आयुक्त यांचे मंजुरी ओदश सोबत जोडत आहे.

मुद्दा क्र.४ :- देयकांत नमुद रकमेवर मुद्रांक शुक्ल घेतलेले दिसुन येत नाही.

खुलासा :- देयकाम नमुद रकमेवर मुद्रांक शुक्ल बाबतचे स्टॅम्प पेपर सोबत जोडत आहे.

मुद्दा क्र.५ :- मा.जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन कक्ष यांचे दि.३१/०३/२०२२ च्या आदेशातील अट क्र.२ नुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन निधी खर्च करतांना प्रशासकीय मान्यता,तांत्रिक मान्यता,निविदा प्रक्रिया केल्याचे दिसुन येत नाही.

खुलासा :- "मा.जिल्हाधिकारी यांनी आवश्यक तेथे प्रशायकीय ,तांत्रिक व निविदा राबविण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केलेले आहे.मा.शासनानेच या संदर्भात दर निश्चित केलेले असल्याने नव्याने निविदा प्रक्रिया न राबविता शासन मान्य संस्थेस (आय सी एम आर) तातडीची गरज म्हणून देण्यात आलेली आहे.त्यामुळे सदर ठिकाणी आवश्यकता नसल्याचे दिसून येते.

मुद्दा क्र.६ :- अनामत रकमा मानपा निधीत जमा झालेचे विभागाने खात्री करावी.उपरोक्त बाबींच्या पुर्ततेसह फेरसादर करावे.

खुलासा :- दि.०६/०७/२०२२ रोजी अनामत रक्कम रू.४.५० लक्ष मनपा निधीत जमा करण्यात आलेली आहे.

उपरोक्त सर्व परिस्थिती ही जिल्हा प्रशासन व शासन यांचे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार केलेले असल्याने दि.३१/०३/२०२२ रोजी महानगरपालिकेस रू.६ कोटी ५० लक्ष देण्यात आलेले आहेत.त्यापैकी २ कोटी ५० लक्ष हे केवळ नमुने तपासणीसाठी दिल्याचे निदर्शनास येत आहे.त्यामधुन सदरचे देयक अदा करणेचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांची स्वक्षरी.

यावर सदरच्या प्रस्तावात ICMRच्या पोर्टलवर सर्व नांदी आढलेल्या असून तपासलेले आहे.मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर "अ" प्रस्तावितनुसार पुढील कार्यवाहीस सादर.

मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१. मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेचे RTPCPचाचणी देयक एकुण रू.अंदाजे १.३७ कोटी इतकी दिसुन येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील नियम ७३(क) प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.२.उदयोग उर्जा कामगार विभाग शासन निर्णय १/१२/१६ नियम ३.२.८ नुसार EOIभागवताना दरासाठी निविदा प्रक्रिया व मागवताना केवळ तांत्रीक निविदा मागवून प्रवठा आदेश देता येईल.त्यासाठी तांत्रीक तपासणी करण्याचे १ ते ४ मुद्दे नमुद केले आहेत.तथापी विभागाने ३.२.८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.३.जिल्हास्तरीय तांत्रीक समितीचे मंजूरी ओदश सोबत जोडण्यात यावे. ४.देयकात नमूद रकमेवर मुद्रांक शुल्क घेतले नाही.५. मा जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन कक्ष यांचे दिनांक ३१/३/२२ च्या आदेशतील अट क्र.२ नुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन निधी खर्च करतांना प्रशासकीय मान्यता ,तांत्रीक मान्यता,निविदा प्रक्रिया केल्याचे दिसुन येत नाही.६.अनामत रकमा मनपा निधीत जमा झालेचे विभगाने खात्री करून उपरोक्त बाबींची खात्रीकरून पुर्ततासह फेरसादर करावे.

यावर शहर लेखा व्यवस्थापन यांचा अभिप्राय की,१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम७३(क) कार्यवाही करण्यात आलेली नाही.२. मुद्दा क्र.२ नुसार शासनाने ठरवून दिलेल्या दराने पुरवठा

आदेश देण्यात आलेला आहे.३.सक्षम प्राधिकारी मा.आयुक्त यांचे मंजुरी आदेश सोबत जोडत आहे.४.शासनाने ठरविलेल्या दराने तातडीची गरज म्हणून पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या अहवालानुसार व शासनाने १४/३/२०२० च्या नोटीफिकेशनव्दारे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सक्षम प्रधिकारी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले होते.

कोव्हिड-१९ महामारीच्या कालावधीत जनतेचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्याने व आणीबाणी सदृश्य स्थिती निर्माण झाल्याने तातडीची उपाय योजना म्हणून कार्यवाही करण्यात आलेली आहे.सदर बाबतीत सक्षम प्राधिकारी तथा मा.आयुक्त महानगरपालिका यांची मान्यता घेवुन देयके अदा करणे व निर्णयास्तव सविनय सादर.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने केलेल्या फेरसादर खुलाशानुसार "अ" प्रमाणे निर्णयास्तव

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१. मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे यांचे माहे १ मे २०२१ ते ४ जुन २०२१ अखेर सादर केलेले देयक प्रस्ताव मुख्यलेखा परिक्षक यांचे दि.२४/६/२०२२ रोजीच्या आक्षेपावर वैदयकीय आरोग्यधिकारी यांनी दिनांक १२/०७/२०२२ रोजी खुलासा पाहता.

२. शासन निर्णय १ डिसेंबर २०१० मधील ३.३.१ मधे तातडीच्या परिस्थितील प्रशासकीय विभाग प्रमुख १ कोटी पर्यतची तातडीची खरेदी असल्यास संबंधीत प्रशासकीय विभागाची खरेदी समिती तातडीच्या गरजांचे मुल्यांकन करून संबंधीत विभागाचे अप्पर मुख्यसचिव /प्रधान सचिव यांचे आध्यक्षेखाली उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने खरेदी करता येईल.

तसेच ३.२.३प्रमाणे पुनप्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल.आणि त्याचे मुल्य व संस्था सरूवातीच्या आदेशाच्या ५०% किंवा रू.१० कोटी यापैकी जी कमी असेल त्यापर्यतची खरेदी करता येईल.

३.मुद्दा क्र.:- २,३ आणि ५ बाबत खुलासा विसंगत दिसून येतो वरील बाबींचे अवलोकन करून प्रस्ताव पुढील निर्णयास्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये २,३ व ५ बाबत विसंगती दिसुन येत आहे असे नमुद केले आहे.त्यामुळे सदर विसंगती मुद्दयांची पुर्तता करून पुन्हा मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून फेरसादर करणे उचित होईल तथापी निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मा.उपायुक्त यांचे निर्देशानुसार सदर संचिकेचे अवलोकन केले असून प्रत्येक चाचणीचे SRFID (DCMRपोर्टल) सादर करावेत.

सर्व माहे एप्रिल,मे व जुन एकत्रित एकच बिल सादर करावे.तद्नंतर छाननी होईल व मनपा अधि.१९४९ ७३(क) नुसार स्थायीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.तरी तात्काळ फेरसादर करणेस मान्यतेस सादर./अ

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार पुर्तता करून फेरसादर करावे.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रूग्णांच्या नाक व घश्याच्या स्त्रावाचे नमुने तपासणीसाठी जिल्हा सामान्य रूग्णालय,अहमदनगर येथे पाठविण्यात येत होते.तथापी कोविड आजाराचा वाढता प्रार्दुभाव पाहता जिल्हा सामान्य रूग्णालय येथे १००० पेक्षा जास्त नमुने तपासणीकरीता असल्याने जिल्हा सामान्य रूग्णालयाने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड-१९ संदर्भातील तपासण्याबाबत असमर्थता दर्शविलेली होती.परिणामी अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड -१९ संशयीत/ संपर्कातील व्यक्तींचे नाक,घसा,स्त्राव नमुने यांची

आर.टी.पी.सी.आर.चाचण्या करणेबाबत अडचणी निर्माण झालेली असल्याने नागरीकांकडून रोष पत्करावा लागत होता.

त्या अनुषंगाने मा.शासनाने निश्चित केलेल्या दरांनुसार संदर्भ क्र.१ अन्वये मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजुरीने मे.मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.ठाणे या संस्थेस प्रति चाचणी रू.५००/- या प्रमाणे कोव्हीड -१९ संशयीत/संपर्कातील व्यक्तींचे नाक,घसा स्त्राव नमुने संकलीत करून चाचणी करणेबाबत संदर्भ क्र.२अन्वये आदेश देण्यात आलेले होते.तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या कोरोना संदर्भातील मिटींग मध्ये जिल्हा सामान्य रूग्णालय येथील महानगरपालिका कार्यक्षेत्राव्यतिरीक्त करण्यात आलेल्या आर.टी.पी.सी.आर चाचण्या अहमदनगर महानगरपालिकेने नियुकती केलेली खाजगी संस्था मे.मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.ठाणे या संस्थे मार्फत करणे बाबत व त्याकालावधीतील देयक अदा करणेबाबत निर्देश दिलेले होते.

त्या अनुषंगाने सदर संस्थेने दि.०८मे २०२१ ते ०५जुन २०२१ अखेरचे देयकांचा तक्ता खालील प्रमाणे

मॉलेक्युलर लॅब प्रा.लि.,ठाणे

| अ.नं. | दिनांक | बील क्र. | कार्यकाल | एकुण चाचण्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१२५ | दि.१/५/२१ ते ७/५/२१ | १८७१ | ५०० | ९,३५,५००/- |
| २ | ८/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१२६ | ३/५/२१ ते ५/५/२१ | १७९४ | ५०० | ८,९७,०००/- |
| ३ | २६/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१४४A | ८/५/२१ ते २०/५/२१ | ३१८९ | ६०० | १९,१३,४००/- |
| ४ | २६/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१४४B | ८/५/२१ ते २०/५/२०२१ | १३७५ | ५०० | ६,८७,५००/- |
| ५ | ०४/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१८६ | २१/५/२१ ते ३१/५/२१ | ४३६४ | ५०० | २१,८२,०००/- |
| ६ | ०४/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१८६ | २१/५/२१ ते २५/०५/२१ | ३५९६ | ६०० | २१,५७,६००/- |
| ७ | ०४/५/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१८६ | २६/५/२१ ते २९/५/२०२१ | ३३५१ | ६०० | २०,१०,६००/- |
| ८ | ०४/०६/२०२२ | MPLLP/२०२१-२२/१८९ | ३०/५/२१ ते ३१/५/२१ | १५९१ | ६०० | ९,५४,६००/- |
| ९ | ०५/०६/२०२१ | MPLLP/२०२१-२२/१९० | १/६/२१ ते ४/६/२१ | १९५३ | ६०० | ११,७१,८००/- |
| १० | ०५/०६/२०२१ | MPLLP/२०२१-२२/१९१ | १/६/२१ ते ४/६/२१ | १५९६ | ५०० | ७,९८,०००/- |
| | एकुण | | | २४६८० | | १,३७,०८,०००/- |

तरी सादर केलेले देयके मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेच्या नावे अदा करणेस प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर लेखा व्यवस्थापक एन.यु.एच.एम.यांचा अहवाल असे.

यावर शहर लेखा व्यवस्थापक यांचा अभिप्राय की,मा.उपायुक्त (कर) यांच्या निर्देशानुसार सदर संचिकेचे अवलोकन करून फेरसादर केलेले आहे.

- प्रत्येक चाचणीचे SRFID ची नस्ती संलग्न केलेली आहे.
- सर्व माहे चे एकत्रित बिल १,३७,०८०००/- रू.चे सादर करण्यात आलेले आहे.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) कार्यवाही केलेली नाही त्या करीता स्थायीकडे पाठविण्यास मान्यतेस सविनय सादर.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शहरलेखा व्यवस्थापक तसेच वैदयकीय आरोग्याधिकारी यांनी केलेल्या फेरसादर खुलाशानुसार उचित कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेस As propusedसादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे या बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- कोरोना काळात आर.टी.पी.सी.आर.चाचणी खाजगी संस्थेकडून करून घेतलेल्या आहेत.त्यांची देयके देणे आहे.२०२१ मध्ये दुसरी लाट आली त्यावेळी शहरामध्ये दैनंदिन १५०० ते २००० रूग्ण आढळून येत होते.सदर रूग्णांची तपासणी करण्यासाठी नमुने जिल्हा रूग्णालयात पाठवत असतांना त्यांचेकडेही मोठया प्रमाणावर सॅम्पल जमा झाल्याने त्याठिकाणी तपासणी करणे शक्य होत नसल्याने मा.जिल्हाधिकारी यांचे आदशानुसार शासन मान्य परंतु खाजगी लॅब ,नाशिक व ठाणे यांचेयेथुन करण्यात आल्या ,शासन दरानुसार आपण सॅम्पल दिलातर रू.५००/- व त्यांच्या कर्मचा-यांनी स्पॅम्पल कलेक्टकेला तर ६००/- असे दर होते.सदर संस्थांनी १ महिनाभर काम केलेले आहे.त्यांचे बिल आहे.

मा.सभापती साहेब :- सॅम्पल गोळा करण्याचे सेंटर कोठे होते.त्यांच्यावर कोण नियंत्रण करित होते.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- महानगरपालिकेचे प्राथमीक आरोग्य केंद्र ,तसेच शहरातील चौका ,चौकामध्ये सॅम्पल गोळा करण्याची काम केलेले आहे.महानगरपालिकेचे वैदयकीय अधिकारी यांचे नियंत्रण होते.सदर सॅम्पल गोळा करणे करीता त्यांनी त्यांची स्वतःची किट वापरलेली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- दि.०८/०५/२०२१ ते ०५/०६/२०२१ या कालावधीमध्ये किती बीले महानगरपालिकेकडे सादर करण्यात आली.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- या कालावधील ICMR पोर्टलवर सर्व नोंदी तपासण्यात आल्या आहेत.त्यानुसार एकुण १० देयकांचे प्रस्ताव तयार करण्यात आले हाते.परंतु मा.उपायुक्त (कर) यांच्या अभिप्रायानुसार सर्व दहा देयके एकत्रीत करून एकुण रक्कम रू.१,३७,०८,०००/- देयक अदा करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) अन्वयेच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- कोव्हिड -१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेने दि.०८/०५/२०२१ ते ०५/०६/२०२१ कालावधीत २४६८० नागरीकांच्या स्त्रावांचे नमुने तपासणी बाबतचे देयक रक्कम रू.१,३७,०८,०००/- देयक अदा करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) अन्वयेच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कोव्हिड -१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी मे.मॉलेक्युलर लॅब,प्रा.लि.ठाणे या संस्थेने दि.०८/०५/२०२१ ते ०५/०६/२०२१ कालावधीत २४६८० नागरीकांच्या स्त्रावांचे नमुने तपासणी बाबतचे देयक रक्कम रू.१,३७,०८,०००/- देयक अदा करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) अन्वयेच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

**विषय क्रमांक : ९१** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास व संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकनार्थ सादर.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज साईज - २०" उंच x ३०" लांब - २४९६० नग खरेदीकामी दै.समाचार दि.२१/०७/२०२२ चे वर्तमानपत्रात,अहमदनगर महानगरपालिका वेबसाईट व अहमदनगर महानगरपालिका नोटीस बोर्डवर नोटीस प्रसिध्द करुन तसेच बाजारात पूरवठादारांशी समक्ष संपर्क साधून कोटेशन दरपत्रके मागवीली असता मुदतीत -

१)श्री.साई कलेक्शन, करमाळा,जि-सोलापूर

२)कल्पना टेक्स्टाईल,सिन्नर,जि-नाशिक

३)चांदवले फॅशन वेअर,श्रीरामपूर,जि-अहमदनगर

याप्रमाणे तीन (३) कोटेशन दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत

सोबत जोडलेला कोटेशन दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ - राष्ट्रध्वज साईज - २०" उंच x ३०" लांब मशिनदवारे तयार केलेल्या पॉलिस्टर कापडाचा भारतीय राष्ट्रध्वज संहितेनुसार प्रमाणित चा दर रक्कम रुपये.३०=०० / प्रती १ नग हा श्री.साई कलेक्शन, करमाळा, जि-सोलापूर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम कोटेशन दर धारक पूरवठादार श्री.साई कलेक्शन, करमाळा,जि-सोलापूर यांना दर निगोसिएशन करीता बोलावून दि.२६/०७/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समिती बैठकीमध्ये कोटेशन दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपूर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा दर निगोसिएशनबाबत निर्णयास्तव ठेवले असता दर निगोसिएशनसाठी ते समक्ष उपस्थित होते.त्यांनी दरपत्रकासोबत दाखल केलेल्या राष्ट्रध्वजाच्या नमुन्याची पडताळणी मा.आयुक्तसाहेब,मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब, मा.उपायुक्तसाहेब(सा.), मा.उपायुक्तसाहेब (कर) मा.सहाय्यक आयुक्त (आस्थापना) यांचे समक्ष करण्यात आली असता श्री.साई कलेक्शन, करमाळा, जि-सोलापुर यांनी दरपत्रकासोबत दिलेला राष्ट्रध्वज्याचा नमुना पसंत करण्यात येवून त्यांचेशी दर वाटाघाटीबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली असता त्यांनी दरपत्रकामध्ये दिलेल्या रक्कम रुपये.३०=०० / प्रती १ नग या दरामध्ये रक्कम रुपये.२=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर कमी करुन रक्कम रुपये.२८=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर दिलेला आहे.त्यांनी दर निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेला दर खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केलेला आहे.पुरवठादार श्री.साई कलेक्शन,करमाळा,जि-सोलापूर यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.मुदतीत प्राप्त दरपत्रकातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशनमध्ये कमी करुन दिलेले अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार श्री.साई कलेक्शन,करमाळा,जि-सोलापुर यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या खालील

तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने खालील तक्त्यात कॉलम क्र.२ मध्ये नमुद सविस्तर वर्णनाप्रमाणे राष्ट्रध्वज कॉलम क्र.३ मध्ये नमुद परिमाणाप्रमाणे त्यांचेकडून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.६,९८,८८०=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सहा लक्ष अठयान्नव हजार आठशे ऐंशी फक्त)च्या खर्चास मंजुरी देणेबाबत तसेच दर मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

| **अ क्र** | **साहित्याचा तपशिल** | **परिमाण** | **कोटेशन दरपत्रकामध्ये नमुद लघुत्तम दर** | **दर वाटाघाटी नंतर दिलेला अंतिम दर** | **खरेदीकामी येणारा एकूण खर्च रक्कम रुपये.** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | राष्ट्रध्वज<br>साईज - २०" उंच x ३०" लांब<br>मशिनद्वारे तयार केलेल्या पॉलिस्टर कापडाचा भारतीय राष्ट्रध्वज संहितेनुसार प्रमाणित | २४९६० नग | ३०=००<br>/ प्रती १ नग | २८=००<br>/ प्रती १ नग | ६,९८,८८०=०० |

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पुरवठादार श्री.साई कलेक्शन, करमाळा,जि-सोलापूर यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास,सदर दराने राष्ट्रध्वज पसंत नमुन्याप्रमाणे उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.२ मध्ये सविस्तर वर्णनाप्रमाणे कॉलम क्र.३ मध्ये नमुद परिमाणानुसार त्यांचेकडून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.६,९८,८८०=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सहा लक्ष अठयान्नव हजार आठशे ऐंशी फक्त)च्या खर्चास मंजुरी देणेबाबत तसेच दर मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केले प्रमाणे "अ"नुसार कार्यवाहीस्तव

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्य.

तसेच

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत रहाव्यात,स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक / क्रांतिकारक / स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे.स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक १३ ऑगस्ट २०२२ ते दिनांक.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

दि.०४/०८/२०२२ रोजी वेलस्पन इंडिया कंपनीकडून पुरवठा करण्यात आलेले मा.विभागीय कार्यालय नाशिक मार्फत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेले ५१००० नग राष्ट्रध्वजाची तपासणी केली असता त्यातील बहुतांश राष्ट्रध्वज भारतीय ध्वजसंहितेनुसार प्राप्त झालेले नसल्याने जा.क्र.साप्रवि-२६५ दि.०५/०८/२०२२ अन्वये मा.उपायुक्त

(सामान्य प्रशासन) नाशिक विभाग,नाशिक यांना सदरचे ५१००० नग राष्ट्रध्वज परत घेवून ध्वजसंहितेनुसार संपूर्ण ५१००० नग राष्ट्रध्वज गुणवत्तापुर्ण प्राप्त होणेस विनंती पत्र दिलेले आहे. तसेच जा.क्र.साप्रवि-२६४ दि.०५/०८/२०२२ अन्वये मा.कार्यासन अधिकारी,नगर विकास विभाग,नवि-२०,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ यांना शासनाकडून आवश्यक झेंडयांची संख्या ५१००० नग कळविली आहे.परंतू त्यांचेकडून विहित मुदतीत नव्याने राष्ट्रध्वज केंव्हा प्राप्त होतील याबाबत निश्चितता नाही.तसेच मा.अपर मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत विभाग,मुंबई यांचेकडील जा.क्र./स्वा.अ.म.-ग्रा.वि./क्षे.अ./२०२२ प्र.क्र./४२ दि.०७/०८/२०२२ रोजीचे पत्रान्वये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "घरोघरी तिरंगा" उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबाबत अ.नं.७ - वेलस्पन इंडिया कंपनीकडून तिरंगा ध्वजाची पूर्तता कमी झाल्यास आवश्यकतेनुसार तिरंगा ध्वजाची पूर्तता स्थानिक स्तरावरुन करण्याची व्यवस्था करावी अशा सुचना आहेत.

आज दि.०८/०८/२०२२ रोजी झालेल्या मा.महासभेमध्ये सन्माननिय सदस्यांनी यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या २४९६० नग राष्ट्रध्वजांची संख्या फारच कमी असल्याने आणखी राष्ट्रध्वज खरेदीबाबत सुचना केलेली आहे.त्यानुसार मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी व मा.आयुक्तसाहेब यांनी आणखी राष्ट्रध्वज खरेदी करणेबाबत आदेश दिलेला आहे.त्यानुसार शहरातील मुख्य पोस्ट कार्यालयात समक्ष चौकशी केली असता त्यांचेकडे किरकोळ विक्री व्यतिरिक्त राष्ट्रध्वजाचा साठा शिल्लक नसल्याचे समजले,तसेच बाजारातील राष्ट्रध्वज विक्रेत्यांकडे समक्ष चौकशी करता पुरवठादारांनी राष्ट्रध्वज उपलब्धतेबाबत असमर्थता दर्शविलेली आहे.

यापुर्वी राष्ट्रध्वज साईज - २०" x ३०" हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशिनद्वारे तयार केलेल्या सुत/पॉलिस्टर/लोकर/सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे २४९६० नग खरेदीकामी बाजारातून कोटेशन दरपत्रके मागविली असता श्री.साई कलेक्शन,करमाळा,जि-सोलापूर यांचा रक्कम रुपये.२८=०० / प्रती १ नग हा दर वाटाघाटीनंतर स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला असून सदर दरास व सदर दराने त्यांचेकडून राष्ट्रध्वज साईज - २०" उंच x ३०" लांब मशिनद्वारे तयार केलेल्या पॉलिस्टर कापडाचा भारतीय राष्ट्रध्वज संहितेनुसार प्रमाणित २४,९६० नग खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.६,९८,८८०=००फक्तच्या खर्चास मा.आयुक्तसाहेब यांनी दि.२७/०७/२०२२ रोजी मंजुरी दिलेली असल्याने पूरवठादार यांना राष्ट्रध्वज पूरवठा करणेबाबत पूरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेला होता सदरच्या पूरवठा आदेशाप्रमाणे पूरवठादार यांनी राष्ट्रध्वजांचा पूरवठा केलेला आहे.पूरवठादार यांना महानगरपालिकेस आवश्यक ५०००० नग राष्ट्रध्वज पुरवठयाबाबत समक्ष विचारणा केली असता त्यांनी प्रथमत:आणखी २५००० नग राष्ट्रध्वज पुरवठयाची तयारी दर्शविलेली आहे.व उर्वरित २५००० नग पुरवठयाबाबत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे.

मा.अपर मुख्य सचिव,ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचेकडील जा.क्र./स्वा.अ.म.ग्रा.वि./क्षे.अ./२०२२ प्र.क्र./२९ दि.०६.०७.२०२२ रोजीचे पत्रान्वये मा.सचिव सांस्कृतिक विभाग भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तिरंगा हा २०:३० इंच साईजमध्ये रु.३०/- फक्तला त्यांनी सुचविलेल्या पुरवठादाराकडून (कबीर कुमार ७०९१४७२५५५ , ८८००२६०७७९)प्राप्त होऊ शकतो.असे सुचित केलेले आहे.त्याप्रमाणे त्यांचेशी यापुर्वीच संपर्क साधला असता त्यांनी दि.११/०७/२०२२ रोजी अनिरत कॉन्ट्रॅक्टस् (ओपीसी) प्रा.लि.,लखनऊ,उत्तरप्रदेश यांचे रु.३०/- + GST ५% + वाहतूक भाडे याप्रमाणे अटी व शर्ती युक्त कोटेशन दरपत्रक दिलेले आहे.तसेच महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,नवी मुंबई यांनी त्यांचे संदर्भ क्र.MSPC/YC/२०२२-२३/३३० दि.१२/०७/२०२२ अन्वये

| अ.क्र. | साईज | पॉलिस्टर रोटो दर रु. | कॉटन दर रु. | रोटो डिजीटल प्रिंट दर रु. वन साईट |
|---|---|---|---|---|
| १. | १२ x १८ | ५०/- | ८८/- | ९२/- |
| २. | १८ x २७ | ५७/- | १२५/- | ११५/- |
| ३. | २४ x ३६ | ७५/- | १८७/- | १६०/- |

+ GST कर वेगळा आकारला जाईल याप्रमाणे कळविलेले आहे.

दि.०८/०८/२०२२ रोजीच्या मा.महासभेत झालेल्या चर्चेनुसार आणखी ५०००० नग राष्ट्रध्वज खरेदी करण्याकामी रक्कम रुपये.१४,००,०००/-फक्त खर्च येईल.

मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस - २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.३.२.३ अन्वये जेव्हा खरेदीची किंमत रुपये.पाच हजार (रु.५,०००/-)पेक्षा जास्त व तीन लाख (रु.३,००,०००/-)पर्यंत असेल तेंव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता) करता येईल.अशी तरतूद होती.मा.महाराष्ट्र शासन उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०२१/प्र.क्र.८/उदयोग-४ मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.०७ मे २०२१ अन्वये उदयोग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या सुधारित कार्यपद्धती नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.३.२.३ मध्ये सुधारणा करुन दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन (३,००,०००/-) रु.१० लाखापर्यंत (१०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.तसेच रु.१० लाख व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.तसेच एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातुन करण्यात आलेल्या खरेदीचे एकुण मुल्य रु.१० लाखापेक्षा (रु.१०,००,०००/-)जास्त नसावे.याप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

परंतू "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" याउपक्रमाचा कालावधी हा दि.१३/०८/२०२२ ते दि.१५/०८/२०२२ याप्रमाणे असून प्राप्त राष्ट्रध्वज शहरातील नागरिकांना तत्पूर्वी सशुल्क उपलब्ध करुन दयावे लागतील.सदर उपरोक्त नमुद मा.शासन निर्णयाप्रमाणे रक्कम रुपये.१० लक्ष रक्कमेपेक्षा अधिक रक्कमेची खरेदी होणार असल्याने ई-निविदा मागवून प्रक्रिया कार्यवाही करणे सद्यस्थितीमध्ये अशक्य आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत उपक्रमासाठी आवश्यक खर्च करणेकामी सन.२०२२-२०२३ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकिय तरतूद करण्यात आलेली नसल्याने या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकिय लेखाशिर्ष - वृक्ष गणना रु.५०,००,०००/-फक्त या तरतूदीतून सदरचा प्रस्तावित खर्च रु.१४,००,०००/-फक्त करावा लागेल.

तरी प्रस्तावित राष्ट्रध्वज खरेदीकामी ई-निविदा कार्यवाही करुन खरेदी करणे आवश्यक कालमर्यादेत शक्य नसल्याने यापूर्वी मंजूर केलेल्या मंजूर कोटेशन दराने ५०००० नग राष्ट्रध्वज साईज - २०" उंची x ३०" लांबी - मशिनद्वारे तयार केलेल्या पॉलिस्टर कापडाचा भारतीय राष्ट्रध्वज संहितेनुसार प्रमाणित खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.१४,००,०००=००फक्त (अक्षरी रक्कम रुपये.चौदा लक्ष फक्तच्या)खर्चास मंजुरी मिळणेस तसेच स्टोअर विभाग दि.२७/०७/२०२२ चे प्रस्तावासह सदरची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर./अ

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,"अ" अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे "अ " नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रामणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,रू.१० लक्ष पेक्षा जास्तीची खरेदी असल्याने व अत्यावश्यक परिस्थीती असल्याने या बाबत करा व कार्यवाही बाबत मुलेप यांचे अभिप्राय असणे आवश्यक आहे.कृपया मुलेप यांचे अभिप्राय मिळावेत.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,A बाबत विभागाने खात्री करून फेरसादर करावे.

यावर मा.स्टोअर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,फेरसादर,विनंती फरसादर करण्यात येते की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार सदरची कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याने मंजुरी मिळावी हि विनंती. आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.स्टोअर विभाग प्रमुख यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही होणेस निर्णयास्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाही बाबत निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास व संविदेची माहिति महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकनार्थ सादर.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गायकवाड परशराम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.तसेच संविदेची माहिति महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.तसेच संविदेची माहिति महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गायकवाड परशराम

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**

---

**विषय क्रमांक : ९२** **दिनांक :- ०१/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता सण उत्सवा करीता मंडप, स्टेज,बॅरेकेटिंग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.२५/०५/२०२२

२.ई - निविदा क्रमांकः- ८०७७१३/सन २०२२-२३

३.निविदा विक्री कालावधीः- दि.१३/०६/२०२२ ते दि.०७/०७/२०२२

४.निविदा स्विकारणेचा कालावधी :- दि.१३/०६/२०२२ ते दि.०७/०७/२०२२

५.निविदा उघडण्याचा दिनांक :- दि.०९/०७/२०२२

६.कामाची मुदत :- १२ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.०२/०८/२०२२ च्या तांत्रीक छाननीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि. ई - ८०७७१३ निविदा क्र.सन २०२२-२०२३ | सन २०२२-२३ करीता सण उत्सवा करीता मंडप,स्टेज,बॅरेकेटींग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक निविदा दराच्या मंजुरी बाबत. | ९५,००,०००/- | कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर | निविदा दरापेक्षा १५.००% कमी दराने | कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर |
| | | | पटवेकर मंडप डेकोरेटर्स अहमदनगर | निविदा दरापेक्षा ९०.००% जास्त दराने | निविदा दरापेक्षा १५ % कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा १५% कमी दराने आलेली असून ती सर्वात कमी दराची आहे.सार्व.बांधकाम विभाग,शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७ / प्र.क्र.०८/इमा-२ दि.नोव्हेंबर २०१८ नुसार निविदा किंमतीच्या १% ते १०% कमी दरापर्यत १% व १०%पासुन १५% कमी दरापर्यत (१५%-१०%) = ५%प्रमाणे (Additional Performance Security Deposit) डी.डी.सादर करणे अनिवार्य आहे.त्या प्रमाणे ठेकेदार यांनी पावती क्र.५९२३ दि.२२/०८/२०२२ अन्वये Additional Performance Security Deposit भरले आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवून निविदाधारक कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा १५% कमी दराने मंजुरीस्तव सविनय सादर.तसेच सदरची निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार निविदा दरापेक्षा १५% कमी दराची "अ" प्रमाणे स्वीकारणेस हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,दर निश्चिती पुर्वी Additional Performance Security Deposit भरणा करणे योग्य नाही.तथापी आदेशार्थ सादर./ब

मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,"ब" बाबत विभागाने खात्री करून विभागाने पुढील कार्यवाही करावी.शासन नियमानुसार कमी दराबाबत ठेकेदाराचा खुलासा घ्यावा.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,विभागाने "क" बाबत कार्यवाही करून मुलेअ व मुलेप यांचे अभिप्राय घेवून फेरसादर करावे.

यावर मा.उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,इकडील जा.क्र.१४६३/ दि.२४/०८/२०२२ अन्वये कमी दराने करणे बाबत व कमी दराचे पृथकरणा बाबत विचारणा केली असता होकारार्थी आ.क्र.२३४४/२४/०८/२०२२ खुलासा कळविले असता मान्य करणेस हरकत नाही.यामध्ये मनपाचा आर्थिक फायदा आहे.त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस मा.स्थायी समिती यांचे कडे पाठविणेस सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,गतपृष्ठावरील "ब" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) चे दर काय आहेत.त्यासह सादर करा.

यावर मा.उप अभियंता यांचा अभिप्राय की,मंडप व बॅरेकेटींग करिता PWD ESSR मधे दर नमुद नाहीत व चौकशी केली असता बाजार दराप्रमाणेच वाटाघाटी करूनच दर अंतिम करावी लागतात.या करीता मागील निविदा दर अंतिम करतांना जिल्हाधिकारी (निवडणूक) शाखेचे लोकसभा २०१४ चे न्युनतम दराशी तुलना करून अंतिम केलेले आहे.व त्यागतवर्षीच्या निविदा दरापेक्षाही चालू निविदा १५% कमी दराने मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

त्यानुसार दराबाबतचा अहवाल मान्यतेस्तव तथा रिपोर्ट मंजुरी सादर.

यावर मा.शहर अभियांता यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" व "ब" नुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणेस्तव प्रस्ताव मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता सण उत्सवा करीता मंडप, स्टेज,बॅरेकेटिंग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक निविदा दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.बाबत माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता श्री.इथापे :- सन २०२२-२३ या वर्षा मध्ये येणा-या उत्सव, सण, समारंभ, मिरवणूका या काळात शहरातील विविध भागांमध्ये पोलिस प्रशासनाच्या संमतीने बॅरेकेटींग करणे,शामीयाना ,मंडप,खुर्च्या टाकणे या करीता वार्षीक निविदा मागविलेली आहे.गणेश विर्सजनावेळी विहीरीवर बॅरेकेटींग करणे ,स्टेज टाकणे तसेच सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना कराव्यालागतात,परिस्थीतीनुसार व वेळेनुसार कामे वाढतात.वार्षीक निविदा आहे.प्रत्यक्षात होणारा खर्च कमी जास्त होवू शकतो.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- मागील वर्षी बॅरेकेटींगचा झालेला खर्च व या वर्षीय सुचविलेली तरतुद यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसुन येत आहे.खर्च का वाढला.सदरचा वाढीव खर्च हा संशयास्पद वाटत आहे.

शहर अभियंता श्री.इथापे :- विषय हा वार्षिक दर मंजुरीचा आहे.वेळेनुसार खर्च कमी जास्त होणार आहे.मागील काही बीले पेंडींग आहेत तेही या खर्चातुन अदा करता येतील.

मा.श्री.गणेश कवडे :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये मंडप टाकणे ,खुर्च्या टेबल भाडयाने घेणे यामध्ये खुर्ची करीता १४ रू.भाडे अदा करण्यात आलेले आहे.यावर्षीचे दर प्रतिखुर्ची ३ प्रमाणे आहे.वास्तवीक पहाता २०१८ मध्ये दर कमी असणे अपेक्षीत होते.

शहर अभियंता श्री.इथापे :- सन २०१८ निवडणूक खर्चा बाबत हायकोर्टा मध्ये याचीका पेंडीग आहे.त्यावेळी जाहीर निविदा मागविली होती.तेव्हा ४ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.त्या निविदांचा तुलणात्मक अभ्यास करून कमीत कमी दराने कामे करणा-या ठेकेदाराची निविदा सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने मंजुरी घेवून काम करून घेण्यात आलेले होते.निवडणूकीचे काम हे कोणत्यावेळी काय येईल हे सांगता येत नाही.रात्री अपरात्री काम करून घ्यावे लागते.राज्य निवडणूक यांच्या दिशानिर्देशानुसार काम करून घ्यावे लागते.इतर महानगरपालिकेच्या तुलना केली असता आपल्या महानगरपालिकेचा निवडणूक खर्च कमी प्रमाणात झालेला आहे.मागील वर्षीचे या कामाचे निविदादर व आत्ताचे निविदा दर हे १५% कमी आहेत.प्रत्यक्षात खर्च कमी होणार आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- शहरातील बॅरीकेटींग करण्याची निविदा आहे.मागील वर्षीच्या तुलनेणे १५% कमी आहे.वेळेवर आयटम वाढले तर १५ टक्यांनी वाढेल.३० लाखाच्या पुढे खर्च गेला तर तसा प्रस्ताव ठेवून वाढीव खर्चस मा.स्थायी समितीची मंजुरी घेण्यात यावी.असे माझे मत आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सन २०२२-२३ करिता रक्कम रू.३० लाखाच्या खर्चास मान्यता देण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजुर.

मा.श्री.गणेश कवडे :- निविदा रक्कम जादा दर्शविण्यात आल्याने यामधील रक्क्म रूपये ३० लाखाच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.पुढील जादा होणा-या खर्चाबाबतचे प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे वेळोवेळी पाठविण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता सण उत्सवा करीता मंडप, स्टेज,बॅरेकेटिंग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक दरास मान्यता देण्यात येत आहे. सन २०२२-२३ करीता निविदाधारक कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा १५% कमी दराच्या

निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट बाबत मा.स्थायी समिती सदस्य,अधिकारी व प्रशासन यांचेशी झालेल्या चर्चे नुसार तसेच निविदेमध्ये दर्शविण्यात आलेली निविदा रक्कम ९५,००,०००/- मधील रक्कम रू. ३०लाखांच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.प्रस्तावित कामा करीता रू.३० लाखांपेक्षा जादा  खर्च झाल्यास, या वाढीव खर्चा बाबतचे प्रस्ताव विभागाने मा.स्थायी समितीच्या मंजुरी करीता पाठविण्यात यावेत.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करिता सण उत्सवा करीता मंडप, स्टेज,बॅरेकेटिंग,शामीयाना व इतर कामाकरीता वार्षिक दरास मान्यता देण्यात येत आहे. सन २०२२-२३ करीता निविदाधारक कैलास मंडप डेकोरेटर्स अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा १५% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट बाबत मा.स्थायी समिती सदस्य,अधिकारी व प्रशासन यांचेशी झालेल्या चर्चे नुसार तसेच निविदेमध्ये दर्शविण्यात आलेली निविदा रक्कम ९५,००,०००/- मधील रक्कम रू. ३०लाखांच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.प्रस्तावित कामा करीता रू.३० लाखांपेक्षा जादा  खर्च झाल्यास, या वाढीव खर्चा बाबतचे प्रस्ताव विभागाने मा.स्थायी समितीच्या मंजुरी करीता पाठविण्यात यावेत.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका